डॉ. राजश्री पराग देशपांडे
mtedit@timesofindia.com

आठवणीतले
प्रा. वसंत कानेटकर

नाटककार वसंत कानेटकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त येत्या १० जानेवारी रोजी साहित्य अकादमीतर्फे नाशिक येथे 'वसंत कानेटकर- व्यक्ती आणि साहित्य' या विषयावर परिसंवाद होत आहे. कानेटकर यांच्या लेखनिक म्हणून काम केलेल्या राजश्री देशपांडे यांनी या निमित्ताने जागवलेल्या त्यांच्या आठवणी...

पदवीस्तरावर मराठी हा विषय विशेषस्तर अभ्यासक्रमात तेव्हा नव्यानेच समाविष्ट झाला होता. महाविद्यालयात आयोजित एका समारंभात प्रा. वसंत कानेटकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या ओघवत्या आणि प्रासादिक वक्तृत्वाने मी भारावले, आसन्याला फांदी गवसली आणि माझी पावले त्यांच्या घराकडे नकळत वळली. त्यांना मदतनीस म्हणून कुणीतरी हवे होते. वक्तशीर व नीटनेटकेपणा याबाबत विलक्षण जागरूक असणारे प्रा. वसंत कानेटकर यांनी लेखनिक म्हणून माझी निवड केली ती माझे वळणदार हस्ताक्षर बघून. पुढची दहा वर्षे हा लेखनप्रवास मला अनेक अर्थांनी समृद्ध करून गेला. प्रत्येक साहित्यकृतीच्या अंतरंगात डोकावून त्याचा तपशील तयार करून तो मोठ्याने वाचत, त्यावर चर्चा करत तो प्रत्यक्षात साकारत असे. चांगल्या कलागुणांचे प्रांजळ कौतुक करत, स्वतः लिहिलेल्या कित्येक साहित्यकृतींना त्यांनी नव्याने अभ्यासले. त्यांची अभ्यासाची खोली तेवढीच टापटीप असे. लेखनाचे टेबल व त्यावरील वस्तू नेमकेपणाने ठेवलेल्या असत.

कानेटकरांना मी 'बाबा' या नावाने संबोधत असे. नाट्यविषयक गप्पागोष्टी करायला त्यांना मनापासून आवडत असे. त्या गोष्टी ऐकवताना बाबा ऐकणाऱ्याला एका वेगळ्याच विश्वात घेऊन जात असत. त्यातील कल्पनाविश्व आणि व्यक्तिचित्रांची मांडणी यावर कित्येकदा आमच्यामध्ये चर्चा होत असत. त्यांच्या लेखनाची पहिली वाचक मीच असल्यामुळे, बाबांनी लिहिलेल्या लेखनावर ते एखादी प्रतिक्रिया मला विचारून आणि ती मनापासून स्वीकारून लेखांमध्ये समाविष्ट करत असत. प्रसंगी रोखठोक भूमिका घेणे, आपल्या विचारांवर आत्मविश्वासपूर्ण ठाम राहणे ही देखील त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची एक बाजू आहे. आमच्या एकत्रित लेखन बैठकीत त्यांच्या अयशस्वी ठरलेल्या नाटकांची समीक्षा ते करत, कधी ते आत्मपरीक्षण करत, तर कधी पुनर्लेखन; यातून अपयशी नाटकाचे कारण प्रयत्नपूर्वक शोधण्याची वृत्ती त्यातून आढळून येते.

'कोणतेही लेखन घाईने होता कामा नये, त्यात एक लय हवी' असा त्यांचा विचार असे. यातून त्यांच्या स्वभावातील, व्यक्तिमत्त्वातील चिंतनशीलता व परिश्रमशीलता या दोन वृत्तिविशेषांची नीट कल्पना येते. प्रा. कानेटकरांच्या एकूण साहित्यामधून कथा-नायकांचे जे स्वभावविशेष आढळतात त्यातील रसिकता आणि साहित्यप्रेम हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून आले असल्याचे ठळकपणे जाणवते. माझ्या जडणघडणीच्या कालखंडात मला बाबांचा सहवास लाभला. 'शिवशाहीचा शोध' या ग्रंथाचे लेखन संपूर्णपणे माझ्या हातून झाले आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाच्या अनेक लकबी माझ्या लक्षात येत गेल्या.

'कोणत्याही लेखकाचे लेखन हा त्याच्या मनात सतत चाललेल्या घडामोडींचा एक आरसा असतो' असे म्हटले जाते. या सत्याचा अनुभव मी लेखनासाठी त्यांच्यासमवेत जो काळ घालवला त्यात मला पूर्णपणे आला. 'कल्पनारम्य शिवशाही कथा' अनेकदा वाचायला मिळतील, पण इतिहासाच्या मूळ गाभ्यात प्रवेश करून कल्पनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त तर्कसंगत अभ्यास करत, बाबांनी प्रत्येक नोंद वास्तवतेच्या कसोटीवर पारखून घेतली. त्यामुळेच 'शिवशाहीचा शोध' ही शिवशाहीचे अंतरंग उकलण्याचा प्रयत्न करत शिवशाही जिवंत करणारी साहित्यकृती आहे. या पुस्तकाचे लेखन होताना कानेटकर कित्येकदा चिंतनामुळे अगदी झपाटून जात. त्या कथावस्तुविषयी, तिच्या मांडणीविषयी त्यांचा सतत विचार चालू असे. काहीसा संकोची आणि बुजरा, एकान्तप्रिय आणि आत्मरत असा स्वभाव त्यांच्या लेखनासाठी महत्त्वाचा ठरला असे मला वाटते.

ते स्वतः नाट्यवाचन करताना मी प्रत्यक्ष समोर बसून अनुभव घेतला आहे. त्यांच्या वाचनावेळी त्यांनी लिहिलेले प्रसंग डोळ्यांसमोर उभे राहत. प्रत्येक पात्राचे विश्लेषण ते करत. कोणत्याही कथानकाचा सूक्ष्म अभ्यास करून ती नाट्यकृती ते घडवत. त्यांच्या नाट्यानुकूल प्रतिभेवर असलेला शेक्सपिअरचा मूलगामी व दूरगामी संस्कार हा एक महत्त्वाचा नाट्य दुवा होता.

समकालीन असलेल्या कित्येक नामवंत लेखक, कवी, नाटककार, दिग्दर्शक यांच्याशी बाबांचे ऋणानुबंध होते. मी लेखनिक म्हणून काम करत असल्याने मलाही अनेकांना भेटता आले. त्या काळी संपर्काचे माध्यम असलेल्या पत्रांचे लेखन करणे, साहित्यिकांच्या पत्रांचे मोठ्याने वाचन करणे ही भूमिका मीच पार पाडत असे. याच काळात माझ्या भाषिक कौशल्यांचा किती प्रकारे विकास झाला याची जाणीव मला आज अध्यापन क्षेत्रात २५ वर्षे अनुभव घेतल्यावर प्रकर्षाने होते.

नाटकांच्या व त्यातील संहितेच्या नोंदी कोणत्याही कागदावर ते लिहून ठेवत नसत. त्या सर्व त्यांच्या मनात इतक्या पक्क्या ठसलेल्या असायच्या की रात्रभर झालेल्या चिंतनातून मी दुसऱ्या दिवशी सकाळी लेखनासाठी गेले की भरभर ते सुसंबद्ध पद्धतीने ते सांगत त्याप्रमाणे मी ते उतरवून घेत. त्यावेळी लेखन करताना कागद कसा असावा, दोन ओळींतील अंतर किती असावे, कागदाचा दर्जा कसा असला पाहिजे... अशा सगळ्या गोष्टींत त्यांची काटेकोर शिस्त असायची. बाबांचे राहणीमानही सर्वांना माहीत होते. अतिशय स्वच्छ आणि नीटनेटकी वेशभूषा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग होती.

एक प्रसंग आठवतो, लेखक, कादंबरीकार विश्वास पाटील यांचे 'महानायक' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले व ते स्वतः नाशिकला पुस्तक द्यायला आले होते. पुस्तक हातात आल्यावर रोज वाचन सुरू झाले. आधी दोन तास लेखन आणि नंतर एक तास 'महानायक'चे वाचन असा रोजचा कार्यक्रम असायचा. 'महानायक' वाचत असताना, सुभाषबाबू देशासाठी इतके काही करत असताना आपण यांत सहभागी झालो नाही, याबाबत बाबांचे मन विषण्ण होताना मी पाहिले आहे.

इ.स. १९९७ साली मी बी.एड. करायला पुण्यात आले. माझ्या पुण्यातील पहिल्याच वर्षात बाबा मला सहा ते सात वेळा भेटायला आले. मी देखील ज्या वेळी नाशिकला जाई तेव्हा थेट आधी बाबांकडे आणि मगच माझ्या घरी जात असे. ज्येष्ठ नाट्यसमीक्षक प्रा. वि. भा. देशपांडे यांच्याशी त्यांनी माझी ओळख करून दिली. 'वसंत कानेटकरांच्या नाटकांतील प्रयोगशीलता' हा माझा पीएचडी प्रबंधाचा विषय. प्रा. वि. भा. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखालीच मी पूर्ण केला.

माझ्या एकूण जडणघडणीत वसंत कानेटकरांचा व त्यांच्या साहित्याचा प्रभाव संशोधनातून नव्याने सिद्ध झाला. बाबा पुण्यात ज्या महाविद्यालयात शिकले त्याच पुण्यातील नामवंत अशा फर्ग्युसन महाविद्यालयात मी मराठी विभागामध्ये अध्यापनाचे कार्य करते आहे. त्यांची ही अक्षरसेवा माझ्या परीने पुढे नेण्याचा प्रयत्न करते आहे. बाबांचे शेवटचे एकांकिकेचे पुस्तक प्रसिद्ध झाले, 'तू माझी अन् तुझा मीच' या पुस्तकाची अर्पणपत्रिका बघून मी धन्य झाले; कारण ते पुस्तक त्यांनी मला अर्पण केले होते. आपल्या साहित्यातून मराठी माणसाचे आयुष्य खऱ्या अर्थाने समृद्ध करणाऱ्या बाबांना विनम्र अभिवादन.

(लेखिका फर्ग्युसन कॉलेजच्या मराठी विभागात सहाय्यक प्राध्यापक आहेत.)